श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-९, अंक-१ | जानेवारी-२०२१ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर रुग्णालय व महाविद्यालय Antiretroviral Therapy Center (‘ए.आर.टी.’) चा लोकार्पण सोहळा

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर रुग्णालय व महाविद्यालयाच्या ‘ए.आर.टी.’ सेंटरचा लोकार्पण सोहळा, संस्थेचे प्रेरणास्रोत मा. श्री. अशोक रघुनाथ जोशी यांच्या उपस्थितीत मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले-गावडे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. ‘जिल्हा एड्स नियंत्रण कार्यक्रम’ अधिकारी श्री. सचिन पाटील हेही या सोहळ्याला आवर्जून उपस्थित होते.

सर्वप्रथम डॉ. सुवर्णा पाटील, वैद्यकीय संचालिका, भ.क.ल. वालावलकर रुग्णालय व महाविद्यालय यांनी संपूर्ण कोकणातील अतिदुर्गम भागात रुग्णालय वर्षानुवर्षे अविरतपणे करीत असलेल्या कामाची माहिती दिली. शासकीय आरोग्य यंत्रणेच्या खांद्याला खांदा लावून दिल्या जाणाऱ्या नि:शुल्क तसेच नि:स्वार्थ रुग्णसेवेच्या विविध योजनांची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली. तसचे ‘ए.आर. टी.’च्या माध्यमातून रुग्णालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व एड्सग्रस्त व ‘एच.आय.व्ही.’ बाधितांना शासकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार योग्य औषधोपचार देऊन हा रुग्णसेवेचा वसा पुढेही असाच चालू ठेवणार असल्याची ग्वाही दिली.



*‘ए.आर.टी.’ सेंटरचे उद्घाटन करताना जिल्हा शल्यचिकित्सक मा. डॉ. संघमित्रा फुले-गावडे, सोबत प्रमुख विश्वस्त श्री. अशोक र. जोशी आणि निमंत्रित मान्यवर*




*जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले-गावडे यांचे स्वागत करताना डॉ. सुवर्णा पाटील*

त्यानंतर बोलताना डॉ. प्रसन्न नकाते यांनी 'ए.आर.टी.' सेंटरची संरचना स्पष्ट केली. रुग्णसेवेसाठी उपलब्ध प्रशिक्षित डॉक्टर्स व इतर कर्मचारी तसेच अचूक निदान करण्याची क्षमता असलेली अद्ययावत विषाणू संशोधन प्रयोगशाळा यामुळे एच.आय.व्ही. बाधितांना फायदा होऊन त्यांचे आयुर्मान व आरोग्य सुधारेल आणि रुग्णालयातील सरकारी व खाजगी मदतीवर यशस्वीपणे चालणाऱ्या इतर आरोग्य सेवांप्रमाणे 'ए.आर.टी.' सेंटर एक महत्त्वाचा घटक म्हणून भविष्यात पुढे येईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

भ.क.ल.वालावलकर रुग्णालय व महाविद्यालयातील एकात्मिक चाचणी व सल्ला केंद्राचे कामकाज उत्तमरीत्या सुरू आहे. निदान झालेल्या एच.आय.व्ही. बाधित गरोदर मातांचे समुपदेशन करून त्यांना वेळीच उपचार घेण्यास प्रवृत्त करून बाधित मातांपासून बाळांना संसर्ग होण्याचा धोका टाळण्याचे महत्त्वाचे काम या केंद्राने यशस्वीपणे केले आहे. या वर्षी 'एड्स दिना'निमित्त जिल्ह्यातील 'उत्कृष्ट एकात्मिक चाचणी व सल्ला केंद्र' म्हणून 'राज्य एड्स नियंत्रण संस्था' व 'राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थे'ने या केंद्राला मानचिन्ह व प्रमाणपत्र दिल्याचे जाहीर केले होते. या लोकार्पण सोहळ्यात मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले-गावडे यांच्या हस्ते श्रीमती प्रियंका फूलचंद गित्ते, समुदेशक आणि श्री. शशिकांत डाफळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना ते देण्यात आले.

मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले-गावडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, सन २००४ पासून आजपर्यंत एच.आय. व्ही. बाधितांवर उपचार करणाऱ्या शासनमान्य 'ए.आर.टी.' सेंटरचे प्रमाण राज्यात कसे वाढले याचा आढावा घेतला. कोकणातील अतिदुर्गम भागात भौगोलिक परिस्थितीमुळे एच.आय.व्ही. बाधितांना कसे विविध समस्यांना सामोरे जावे लागते या विषयीची माहिती देऊन भ.क.ल.वालावलकर रुग्णालय व महाविद्यालयात सुरू झालेले 'ए.आर.टी.' सेंटर हे मंडणगड, दापोली, खेड, चिपळूणसारख्या रत्नागिरीहून दूर असलेल्या भागातील एच.आय. व्ही. बाधित रुग्णांसाठी सोयिस्कर होईल व अंदाजे १००० ते १५०० रुग्णांना या 'ए.आर.टी.' सेंटर च्या सेवेचा लाभ होईल असे मत मांडले. तसेच 'ए.आर.टी.' सेंटरला अद्ययावत करण्यासाठी शासनामार्फत योग्य ती मदत करू असे आश्वासन देऊन त्यांनी 'ए.आर.टी.' सेंटरला शुभेच्छा दिल्या.

या लोकार्पण सोहळ्यास भ.क.ल. वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय डोंबले, डॉ. नेताजी पाटील, प्राध्यापक- रेडिओलॉजी विभाग, डॉ. जान्हवी देशपांडे, प्राध्यापिका- मेडिसिन विभाग, डॉ. मैत्रा चोयती, प्राध्यापिका- शरीरशास्त्र विभाग, आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच डॉ. गरुड, वैद्यकीय अधीक्षक- उपजिल्हा रुग्णालय कळबंणी, डॉ ज्योती यादव, तालुका वैद्यकीय अधिकारी- चिपळूण, डॉ. भावठाणकर, तालुका वैद्यकीय अधिकारी- मंडणगड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या सोहळ्याला 'विहान' या एच. आय. व्ही. बाधितांसाठी काम करणाऱ्या संस्थेतील माननीय सौ. प्रेरणा गोवेकर, श्री. मिलिंद विष्णू राजवाडे, सौ. मीरा मिलिंद चव्हाण, श्री. सुनील जाधव व सौ. मनाली शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. चिन्मय केळकर यांनी केले.



*डॉ. संघमित्रा फुले-गावडे आपले विचार व्यक्त करताना*

# कोकणात प्रथमच अवयवारोपणाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी



डॉ. प्रतीक हेगडे

लाडघर, ता. दापोली येथील एका गरीब परिवारातील सतरा वर्षांचा तरुण मांडीच्या हाडाच्या कर्करोगाने गंभीर अवस्थेत भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात आणण्यात आला होता (advanced lower extremity bone tumor - Osteosarcoma of distal femur). अशा केसमध्ये वेळीच अचूक निदान होणे आणि योग्य उपचार होणे हे महत्त्वाचे असते आणि अवयव वाचविण्यासाठी उपचारांचा अतिशय योजनाबद्ध मार्ग ठरवावा लागतो. निदान झाल्याबरोबर त्या तरुणावर त्वरीत केमोथेरपीचे उपचार सुरू करण्यात आले आणि केमोची ४ आवर्तने झाल्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मांडीच्या हाडाचा रोगग्रस्त भाग काढून तेथे कृत्रिम भागाचे आरोपण करण्यात आले. या रुग्णालयात प्रथमच अत्यंत प्रगत असे अस्थि-कर्करोग उपचार (Orthopedic Oncological procedure) करण्यात आले. मुंबईचे डॉ. प्रतीक हेगडे, M.S. (Orthopaedics), DNB (Orthopaedics), MRCS (Edinburgh), आणि डॉ. मिशिल पारीख, M.S. (Orthopaedics), M.Ch. (Orthopaedics), Fellowship in Orthopaedic Oncology (Tata Memorial Hospital) या शल्यचिकित्सक द्वयीने (Orthopaedic Oncologists) वालावलकर रुग्णालयातील ऑर्थोपिडीक आणि ॲनेस्थेशिया टीमच्या मदतीने ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. रुग्णासाठी आता शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन कार्यक्रम सुरू असून अजून काही केमोथेरपीची आवर्तने त्याला देण्यात येतील. अवयवारोपणाचे आधुनिक तंत्र, केमोथेरपीच्या तंत्रातील सुधारणा, आणि रोगाचे अधिक चांगले निदान होण्यासाठी जीवशास्त्राची होणारी मदत यामुळे अस्थी-कर्करोगात पूर्वानुमान लवकर होते आणि अवयव वाचविण्यासाठीची शस्त्रक्रिया सुलभ होते.



डॉ. मिशिल पारिख






शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन कार्यक्रम

# अचानक येणारे अंधत्व दूर करण्यासाठी मेंदूतील रक्तवाहिन्यांची क्ष–किरण तपासणी कोकणात प्रथमच अशा पद्धतीचे उपचार यशस्वी

## (A cerebral angiography to conquer sudden blindness)



अत्याधुनिक उपचारांमुळे अंधत्व टळले.

खेड तालुक्यातील सुशेरी या खेडेगावातील एक ३३ वर्षांचा रुग्ण अचानक दृष्टी गेल्यामुळे पडल्याने तात्काळ वालावलकर रुग्णालयात आणण्यात आला होता. सखोल तपासणी करण्यासाठी त्याच्या मेंदूची 'अँजिओग्राफी' करण्यात आली. मेंदूतील एका रक्तवाहिनीत रक्ताची मोठी गुठळी होऊन रक्तप्रवाह अडला होता. डोक्याकडे रक्तपुरवठा करणाऱ्या मुख्य दोन धमन्यांपैकी एक असलेली 'कॅरोटिड धमनी' पूर्णपणे बंद झाली होती. त्याला hyper-homocysteinemia चाही त्रास होत होता. डॉ. अमित साहू (interventional radiologist) यांच्या नेतृत्त्वाखाली डॉक्टर्स आणि रेडिऑलॉजी विभागातील तंत्रज्ञांनी ही 'अँजिओग्राफी' केली. अशा तऱ्हेची कौशल्यपूर्ण उपचारपद्धती कोकणात प्रथमच वापरण्यात आली आणि रुग्णाची तब्येत आता झपाट्याने सुधारत आहे. निष्णात डॉक्टरांनी अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान वापरून केलेल्या अशा उपचारांचा फायदा प्रामुख्याने कोकणातील गोरगरीबांना मिळत आहे.




डॉ. अमित साहू रुग्णाची सेरेब्रल अँजिओग्राफी करताना

# ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलात पाचव्या ‘बी. के. एल. वालावलकर क्रॉस कंट्री स्पर्धे’चे यशस्वी आयोजन




‘अठरा वर्षांखालील मुले’ वयोगटाच्या स्पर्धेचा शुभारंभ

डेरवण दि. ५ जानेवारी : ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलात पाचव्या ‘बी. के. एल. वालावलकर क्रॉस कंट्री स्पर्धे’चे आयोजन करण्यात आले होते. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई, पालघर, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर येथून आलेल्या विविध वयोगटातील ४९९ धावपटूनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्घाटन सावर्डे पोलीस ठाण्याचे अधिकारी श्री. भरत धुमाळ यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोक र. जोशी, रत्नागिरी जिल्ह्यातील ज्येष्ठ क्रीडासंघटक संदीप तावडे, वालावलकर रुग्णालयातील डॉ. प्रदीप कुलकर्णी, ‘एसव्हीजेसीटी’ इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धा १२, १४, १६ आणि १८ वर्षांखालील मुले व मुली अशा आठ गटात घेण्यात आल्या. सर्व सहभागी खेळाडूंना मास्क आणि टी शर्ट आयोजकांच्या वतीने देण्यात आले. स्पर्धेच्या ठिकाणी सॅनिटायझर, तापमानाची मोजणी तसेच सुरक्षित अंतर ठेवून सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली होती. १८ वर्षाखालील मुलांच्या गटात तसेच १४ वर्षाखालील मुलींच्या गटात चांगला सहभाग नोंदविण्यात आला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अन्नदा डामरे, प्रतीक्षा थोरात, निरंजना आणि निहारिका नंदनवनकर या सहा वर्षांच्या चार मुलींनी २ किमी अंतर पळून भविष्यात येथील खेळाडू नक्कीच उत्तुंग यश मिळवतील याची ग्वाही दिली.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:

**१२ वर्ष मुले (२ कि. मी.) –** १. आकाश रघुनाथ कळमकर (चीनशेट्टी विद्यालय, निगवे) २. सोहम संजय पाटील (दुधगंगा विद्यालय, कागल) ३. शुभम सुनील पुजारी (नॅशनल स्पोर्ट्स, उमाळवाड) ४. दर्शन सुनील पुजारी (नॅशनल स्पोर्ट्स, उमाळवाड) ५. ऋतुराज संतोष बेनाडे (डी.के.टी. स्पोर्ट्स, शिरोळ)




‘चौदा वर्षांखालील मुली’ वयोगटाची स्पर्धा – उत्तम प्रतिसाद




*स्पर्धेतील एक अटीतटीचा क्षण*

**१२ वर्ष मुली (२ कि. मी.) –** १. श्रावणी नरेंद्र लीबे (महेंद्र स्पोर्ट्स, कराड) २. श्रावणी विकास गरुड (महेंद्र स्पोर्ट्स, कराड) ३. अनुजा निलेश पवार (शिवरत्न ॲकॅडमी, चिपळूण) ४. तपस्या विश्वास किणी (जगन्नाथ स्मृती क्लब, अर्नाळा) ५. हुमेरा हुमाईन सय्यद (महेंद्र स्पोर्ट्स, कराड)

**१४ वर्ष मुले (३ कि. मी.) –** १. अथर्व राहुल मोरे (डी.के.टी. स्पोर्ट्स, शिरोळ) २. सागर तानाजी निगवे (चीनशेट्टी विद्यालय, निगवे) ३. अब्राहम खाजदार सर्जदार (रायगड) ४. कार्तिक आनंदा भिसुरे (कागल) ५. अनिल दासू जाधव (यशवंत हायस्कूल, कराड)

**१४ वर्ष मुली (२ कि. मी.) –** १. वैभवी प्रकाश कुंभार (नॅशनल स्पोर्ट्स, उमळवाड) २. सुरेखा राजेंद्र कराकते (कबनूर हायस्कूल, इचलकरंजी) ३. आयुषा नंदकुमार वास्के (कन्या शाळा, कराड) ४. भक्ती विजय मगधूम (नॅशनल स्पोर्ट्स, उमळवाड) ५. कृपेशा गणेश मेहेरे (जगन्नाथ स्मृती क्लब, पालघर)

**१६ वर्ष मुले (४ कि. मी.) –** १. आदित्य आनंदा पाटील (नॅशनल स्पोर्ट्स, कोरोची) २. आदित्य महावीर लोंढे (नॅशनल स्पोर्ट्स, कोरोची) ३. स्वराज संदीप जोशी (शिवरत्न ॲकॅडमी, चिपळूण) ४. समीर संजय कदम (विश्वनाथ विद्यालय, लवेल) ५. प्रमोद विठ्ठल पोवार (नॅशनल स्पोर्ट्स, उमळवाड)

**१६ वर्ष मुली (३ कि. मी.) –** १. वैष्णवी भास्कर मोरे (कन्या शाळा, कराड) २. रिवा देस्मोंड डीसा (रायझिंग स्टार स्पोर्ट्स क्लब, बोरीवली) ३. कृतिका नरेश वाघमारे (जगन्नाथ स्मृती




*बक्षीस समारंभ*

क्लब, अर्नाळा) ४. सोफिया गोम्स (रायझिंग स्टार स्पोर्ट्स क्लब, बोरीवली) ५. सानिका अभिजित नलावडे (स्व. शेठ रामविलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड)

**१८ वर्ष मुले (६ कि. मी.) –** १. अनिकेत अनंत चांदिवडे (टी.डब्ल्यू.जे. क्लब, चिपळूण) २. रोहित उत्तम नलावडे (नॅशनल स्पोर्ट्स, कोरोची) ३. मृणाल मनोहर सरोदे (उरण जिमखाना, उरण) ४. ऋतुराज राजेश घाणेकर (शिवरत्न ॲकॅडमी, चिपळूण) ५. सनी संदीप पवार (पूज्य सानेगुरुजी विद्या मंदिर स्कूल, पालगड)

**१८ वर्ष मुली (४ कि. मी.) –** १. साक्षी संजय जड्याळ (शिवरत्न ॲकॅडमी, चिपळूण) २. भक्ती राजगोंडा पाटील (नॅशनल स्पोर्ट्स, कोरोची) ३. साक्षी सुभाष पवार (चिपळूण स्पोर्ट्स, ॲकॅडमी) ४. गुड्डीकुमारी मथुरा सिंह (सोनी स्पोर्ट्स, कोल्हापूर) ५. पूजा तुकाराम रामाणे (न्यू इंग्लिश स्कूल, माखजन)

सर्व गटातील विजेत्या पाच क्रमांकांच्या खेळाडूंना रोख रक्कम, पदक, प्रावीण्य प्रमाणपत्र जिम्नॅस्टिकचे प्रशिक्षक सचिन मांडवकर, दिलीप घुले, योगेश विचारे, प्रशांत सावंत, विजय जाधव या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या स्पर्धेत रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे, कोल्हापूर आदी जिल्ह्यातून ग्रामीण भागातील स्पर्धक मोठ्या प्रमाणावर सामील होणे हे भावी काळासाठी सुचिन्ह आहे. 'एसव्हीजेसीटी'च्या समर्पित भावनेने काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवकांच्या परिश्रमाचा या स्पर्धेच्या यशस्वीतेत मोठा वाटा आहे.

क्रीडासंचालक श्री. श्रीकांत पराडकर यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी व्हावे यासाठी महाराष्ट्रात सर्वदूर (विशेषत: ग्रामीण भागात) संपर्क साधून ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. तसेच संपूर्ण नियोजन अत्यंत सुविहित पद्धतीने केले.




*सहा वर्षांच्या अन्नदाने २ कि.मी. अंतर धावून पूर्ण केले.*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१

ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com






*स्वयंसेवकांचे पाठबळ*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/

**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०